नि.फौ.प्र.क्र. ७९/२०१५
सरकार विरूध्द दिलीप व इतर
निशाणी क्र. ४९

**<u>सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र.०४ ची शपथेवर साक्ष.</u>**

मी शपथेवर कथन करतो ते येणेप्रमाणे:

माझे नांव : गोपाल साहेबराव ध्रुवे ब.न.१५१९
वय : ४७ वर्ष,
कामधंदा : हे.कॉ. पोलीस मुख्यालय अकोला.
राहणार : रिधोरा ता. बाळापूर जि. अकोला.

**<u>सरतपासणी सरकारतर्फे विधिज्ञ श्री. व्ही.बी. गरड यांचे मार्फतः—</u>**

**०१.** मी सन २०१३ पासून ते २०१९ पर्यंत चान्नी पो.स्टे. येथे हे.कॉ. या पदावर कार्यरत होतो. मला दिनांक २१.११.२०१४ रोजी गुन्हा क्रमांक १२७/२०14 च्या गुन्हयाची केस डायरी भेटली होती. त्या सोबत मला एफ. आय.आर. जबानी रिपोर्ट, वैदयकीय प्रमाणपत्र प्राप्त झाले होते. त्या नंतर मी घ टनास्थळावर जावून फिर्यादीने दाखविलेल्या घटनास्थळाचा पंचनामा दोन पंचासमक्ष तयार केला होता. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी, व दोन पंचाच्या सहया आहेत. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यास **<u>निशाणी ५०</u>** देण्यात येते. त्यानतंर दि. २७.११.२०१४ रोजी आरोपींना अटक करण्यात आली. आता मला सर्व आरोपींचे अटक पंचनामे दाखविण्यात आले त्यावर माझी, आरोपींची व पंचांची सही आहे. त्यास **<u>नि. ५१ ते ५३</u>** देण्यात येते. त्यानतंर मी आरोपी विजय कडून काठी व आरोपी अमोल कडून कु—हाड जप्त केली होती. आता मला जप्ती पंचनामे दाखविण्यात आले. त्यावर माझी, व दोन पंचाच्या सहया आहेत. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यास **<u>निशाणी ५४ व ५५</u>** देण्यात येते. त्यानतंर साक्षीदारांचे बयान त्यांचे सांगण्याप्रमाणे नोंदविले होते. प्रकरणात आरोपींविरूध्द सबळ पुरावा आढळून आल्यामुळे मी त्यांचेविरूध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते. मी आरोपीला पाहिल्यास ओळखू शकतो. आज रोजी आरोपी न्यायालयात हजर आहे.

**<u>सर्व आरोपींकरिता विधिज्ञ मानकर यांचे मार्फत उलटतपास सुरूः—</u>**

**०२.** आता मला सा.क्र.२ शे. अब्दुल्ला जहीरउद्दीन याचे बयान दाखविण्यात आले. साक्षीदाराने बयान देते वेळी हे सांगीतले नव्हते की, आरोपी विजय ने माइया मुलाच्या उजव्या पायावर काठीने मारले होते, (सरकारी वकीलांची हरकत की बयानामध्ये दोन्ही पायांवर काठीने मारल्याचे नमूद आहे.)

**०३.** हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादीने दाखविलेलया घटनास्थळाचा पंचनामा केला होता, तसेच आरोपींकडून एक काठी व कु—हाड जप्त केल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी साक्षीदारांचे बयान त्यांचे

सांगण्याप्रमाणे नोंदविल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास पूर्ण.</u>**
**<u>फेरतपास नाही.</u>**

श्रवणोत्तर स्विकृत,
स्वा/—
दिनांक: ०६.०३.२०२६. (प्रसाद एस. ठाकरे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, पातुर.